# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२३

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### नैसर्गिक व आर्थिक अडचणीत सापडलेल्या राज्यातील शेतकऱ्यांना वीज दर माफी मिळणेबाबत

**(१) १०५२९ (१९-११-२०२१) श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अतिवृष्टी व ओला दुष्काळ यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीपिके, फळबागा, शेतजमिनींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी प्रचंड आर्थिक अडचणीत आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांची आर्थिक अडचण कमी करण्यासाठी राज्यातील शेतकऱ्यांना वीज दर माफी किंवा वीजदर सवलत द्यावी, त्यांची वीज कापू नये यासाठी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील अतिवृष्टी व ओला दुष्काळामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना वीज दर माफी किंवा वीजदर सवलत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) शासनातर्फे वेळोवेळी जाहीर करण्यात आलेल्या दुष्काळी भागातील करण्यात येणाऱ्या उपाययोजनामध्ये वीज दरात ३३.५% सवलत कृषी ग्राहकांना देण्यात येते. तसेच टंचाईसदृश्य गावातील कृषीपंपाची वीज खंडीत करण्यात येत नाही. सन २०१४ पासून कृषी ग्राहकांना रुपये ३१३९.७५ कोटी इतक्या रक्कमेची सवलत देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर विभागातील रेल्वे विद्युतीकरणाच्या भूसंपादनाबाबत

**(२) १११६७ (०५-०१-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील बाळे, मोहोळ हद्दीतील ८ कि.मी. रेल्वे मार्गाचे विद्युतीकरणाचे काम जमीन भुसंपादनाअभावी रखडले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित ठिकाणी भूसंपादन करण्यास कोणत्या अडचणी आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने शासनाने करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०३-११-२०२३) :** (१), (२), (३) नाही.

सदर प्रकरणी खाजगी वाटाघाटीने जमीन खरेदीद्वारे भूसंपादन पूर्ण करण्यात आले असून मोबदला वाटप करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील सफेद कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत

**(३) १२१९६ (३०-०३-२०२२) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (ता.जि.रायगड) तालुक्यासह इतर तालुक्यात साधारणत: नोव्हेंबरमध्ये सफेद कांद्याची अधिक प्रमाणात लागवड केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अलिबाग तालुक्यातील कार्ले, खंडाळे, नेहूली, बामणगाव, तळवळी व रामराज व रोहा तालुक्यातील खांब व देवकान्हे या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात सफेद कांद्याची लागवड केली जाते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान उद्भवलेल्या अवकाळी पाऊस तसेच धुके या सारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे सफेद कांद्यांवर करपा रोगाचा धोका निर्माण झाला असून चालू हंगामात कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सफेद कांदा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी कोणती कार्यवाही उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१६-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

अलिबाग तालुक्यामध्ये रब्बी हंगाम २०२१ मध्ये २२० हे. क्षेत्रावर लागवड करण्यात आली होती. रोहा तालुक्यामध्ये रब्बी हंगाम २०२०-२१ मध्ये मौजे देवकान्हे गावात ०.४० हे क्षेत्रावर लागवड करण्यात आली होती.
(३) होय, हे खरे आहे.
रब्बी हंगामात २०२१ मध्ये अल्प प्रमाणात नुकसान झाले.
(४) अलिबाग तालुक्यात कांदा लागवड सपाट जमिनीवर केल्यामुळे अवेळी झालेल्या पावसाच्या पाण्याचा निचरा न झाल्यामुळे मर रोग व उशिरा लागवड केलेल्या रोपांवर करपा या रोगाचा प्रादुर्भाव थोड्या प्रमाणात झाला होता.त्यासाठी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ बोलवून क्षेत्रिय पाहणी करुन शेतकऱ्यांना सरी वाफा पध्दतीने लागवड करण्याबाबत आणि मर व करपा रोगांचे व्यवस्थापन करण्यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. तसेच गाव बैठक घेवुन घडी पत्रिका वाटप व प्रचार प्रसिद्धी करण्यात आली.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर-मुंबई समृध्दी महामार्ग प्रकल्पग्रस्तांना बाजार मुल्यानुसार भाव मिळणेबाबत

**(४) १३७६१ (२५-०८-२०२२) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १२०७६ ला दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर-मुंबई समृध्दी महामार्ग प्रकल्पग्रस्तांना बाजार मुल्यानुसार जमिनीचा भाव देण्याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाने शासनास आदेशित केल्याचे सन २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जालना, हिंगोली व नांदेड जिल्ह्यातील चौपदरी समृध्दी महामार्गाच्या कामाबाबत शेतकऱ्यांना बाजार मुल्यानुसार जमिनीचा भाव देण्याबाबतची कार्यवाही मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे करण्यात आली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सबंधित प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना बाजार मुल्यानुसर आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, संपादित होणाऱ्या जमिनीची, रक्कमांची जिल्हानिहाय माहिती काय आहे, तसेच किती मुदतीत सदरहू महामार्ग कार्यान्वित होईल याबाबत शासनाचे नियोजन काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१०-२०२३) :** (१), (२) व (३) नागपूर-मुंबई समृध्दी महामार्ग प्रकल्पग्रस्तांना बाजार मुल्यानुसार जमिनीचा भाव देण्याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश झाल्याचे उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येत नाही.
तसेच, जालना व नांदेड येथे अद्याप निवाडा जाहीर करण्यात आलेला नसुन हिंगोली जिल्ह्यातुन नागपूर-मुंबई समृध्दी महामार्ग जात नाही. जालना व नांदेड समृध्दी महामार्गासाठी संपादित जमिनीचे निवाडे अद्याप घोषीत करण्यात आलेले नसुन अंतिम निवाड्यावेळी भूसंपादन अधिनियम २०१३ च्या कलम २६ ते ३० प्रमाणे मावेजा परिगणना करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिंगोणा (ता.यावल, जि.जळगाव) येथे शासकीय केळी उतीसंवर्धन प्रकल्प सुरु करण्याबाबत

**(५) १६१६६ (२८-१२-२०२२) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोणा (ता.यावल, जि.जळगाव) येथे शासकीय केळी उतीसंवर्धन प्रकल्पासाठी शासनाने जागा उपलब्ध करुन दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर केळी उतीसंवर्धान प्रकल्प अद्याप सुरु करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०३-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी अंतर्गत व्यावसायिक तत्वावर कृषी संशोधन केंद्र, जळगाव व मौजे हिंगोणा येथे उतिसंवर्धन केळी रोपे निर्मिती केंद्र स्थापन करण्याच्या प्रस्तावास महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे या कृषी परिषदेच्या दिनांक २७/०६/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली असून शासनाकडे शिफारस केली आहे. तथापि, सदर प्रकल्पास जमीन हस्तांतरण करणेबाबत मा.उच्च न्यायालय,मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र.६२५९/२०१६ दाखल झालेली असून या न्यायालयीन प्रकरणाबाबत मा.न्यायालयाचा अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यात रायगव्हाण व येळपणे शिवारात दोन बिबट्यांचा मृत्यू झाल्याबाबत

**(६) १६६०५ (२८-१२-२०२२) श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यात रायगव्हाण व येळपणे शिवारात एकाच दिवशी दोन बिबट्यांचा मृत्यू झाल्याची बाब दिनांक २४ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागाने या बिबट्यांचा मृत्यूच्या कारणाचा तपशिल घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (०३-११-२०२३) :** (१), (२) व (३) दिनांक २१ सप्टेंबर,२०२२ रोजी रायगव्हाण येथे एक आजारी बिबट आढळल्याची माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी, श्रीगोंदा, वनरक्षक / वनपाल हे घटनास्थळी गेले असता अतिषय क्षीण अवस्थेत असलेली बिबट (मादी) आढळून आली. सदर बिबट्यावर पशुवैद्यकीय अधिकारी (गट-अ) श्रेणी-१ बेलवंडी यांचे कडे औषधोपचार सुरु असताना Pneumonia मुळे दिनांक २२ सप्टेंबर,२०२२ रोजी मृत्यू झाल्याचे शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे.

तसेच दिनांक २२ सप्टेंबर,२०२२ रोजी मौजे येळपणे येथे एक बिबट (मादी) मृत अवस्थेत असल्याचे निदर्शनास आली आहे. सदर बिबट्याचा मुत्यु internal hemorrhage caused by injury in thoracic cavity मुळे झाल्याचे शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## एम.फिल. अर्हताधारक प्राध्यापकांना कॅसचे लाभ देण्याबाबत

**(७) १७६३८ (२५-०३-२०२३) श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एम. फिल अर्हता धारक प्राध्यापकांना अद्यापही कॅसचे लाभ दिलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एम. फिल अर्हताधारकांना युजीसीच्या निकषानुसार हे लाभ देणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने एम. फिल अर्हताधारकांना हे लाभ कधी प्राप्त होतील ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (१९-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) एम. फील. ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या प्राध्यापकांना कॅसचे लाभ देण्यासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ०५/०९/२०२२ च्या पत्रान्वये स्पष्टीकरण दिले आहे. सदर स्पष्टीकरण विचारात घेऊन दिनांक १६/०२/२०२३ च्या पत्रान्वये संचालक, उच्च शिक्षण यांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले आहे. “दिनांक १४/०६/२००६ पूर्वी ज्या अध्यापकांनी सेवेत असताना एम. फील. अर्हता धारण केली असेल, तसेच ज्या अध्यापकांनी दिनांक १४/०६/२००६ पूर्वी नियुक्तीवेळी एम. फील. अर्हता धारण केली होती, अशा अध्यापकांची नियुक्ती जर विहित निवड समितीच्या माध्यमातून झाली असेल, तसेच अशा अध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने एम.फील अर्हतेच्या आधारे नेट परीक्षेमधून सुट देऊन त्यांच्या नावासहित तसे संबंधित विद्यापीठांना कळविलेले असेल व विद्यापीठाने नियमित स्वरूपात मान्यता दिलेली असेल, तर (१) ज्या अध्यपंकानी नियुक्तीपूर्वी एम. फील. अर्हता धारण केली असेल, त्यांना नियुक्तीपासून व (२) ज्यांनी सेवेत असताना एम. फील. अर्हता धारण केली असेल, त्यांना सदर अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ देय राहतील.” वरील स्पष्टीकरण विचारात धेऊन संबंधितांना कॅसचे लाभ देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## मेंढोदे (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील पुनर्वसन प्रक्रीयेंतर्गत भूखंडाचे कब्जा हक्काची रक्कम कमी करणेबाबत

**(८) १७६६८ (२५-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेंढोदे (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील पुनर्वसन प्रक्रीयेंतर्गत दुसऱ्या टप्प्यात ६६ भूखंड वाटप करण्यात आले असून सदर भूखंडाचे कब्जा हक्काची १०३.७४ प्रती चौरस फुट एवढी रक्कम भूखंडधारकांना भरणे शक्य नसल्याबाबत अशासकीय जिल्हा सदस्य, पुनर्वसन समिती जळगाव यांनी दिनांक २१ एप्रिल, २०१७ रोजी जिल्हाधिकारी, जळगाव यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन मेंढोदे (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील पुनर्वसन प्रक्रीयेंतर्गत भूखंडाचे कब्जा हक्काची रक्कम कमी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील (०३-११-२०२३) :** (१) जळगांव जिल्ह्यातील हतनुर प्रकल्पामधील मौजे मेंढोदे ता.मुक्ताईनगर येथील पुनर्वसन प्रक्रीये अतंर्गत दुसऱ्या टप्प्यात ६६ भूखंड वाटप करण्यात आलेले असून सदर भूखंडाची कब्जा हक्काची १०३.७४ प्रति चौ.फुट एवढी रक्कम भूखंडधारकांना भरणे शक्य नसल्याबाबत अशासकीय जिल्हा सदस्य पुनर्वसन समिती जळगांव यांनी दिनांक २१ एप्रिल २०१७ रोजी जिल्हाधिकारी जळगांव यांना निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) मौजे मेंढोदे येथील कब्जा हक्काची रक्कम कमी करण्याबाबत प्विशेष बाब सुधारित प्रस्ताव जिल्हाधिकारी, जळगाव यांच्या कार्यालयाकडून दिनांक ६/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाला असून, सदर प्रकरणी कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील भूमिअभिलेख कार्यालयातील अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत

**(९) १९०९४ (०८-०८-२०२३) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी : दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक १५९७९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालयात माहे मे-२०२२ अखेर मध्ये वा त्यासुमारास १५१२ प्रकरणे मोजणी अभावी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी जिल्ह्यातील भूमी अभिलेख कार्यालयात शेत जमिनीच्या मोजणीसाठी हजारो अर्ज शुल्क भरूनही अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याने शेतकरी व नागरीकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक प्रकरणे मोजणी प्रकरणे सोईनुसार निकाली काढणे, तर काही प्रकरणे जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवणे असे प्रकार करण्यात येत असल्याने, विहित मुदतीत प्रकरणे मोजणी अभावी प्रलंबित

राहील्या बद्दल परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०९-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

परभणी जिल्ह्यात माहे मे,२०२२ अखेर १४७२ मोजणी प्रकरणे शिल्लक होती. त्यापैकी १४१३ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून भूसंपादन, न्यायालयीन स्थगिती, विनंती अर्ज, तांत्रिक अडचण असलेली शिल्लक ५९ प्रकरणे निकाली काढण्यात येत आहेत. माहे ऑगस्ट २०२३ अखेर एकूण ३३५९ मोजणी प्रकरणे आवक झाली असून त्यापैकी १८३१ मोजणी प्रकरणे निकाली झाली असून एकूण १५२६ मोजणी प्रकरणे शिल्लक आहेत. तसेच, माहे मे,२०२२ अखेर परभणी जिल्ह्यात गट क पदसमुह ४ कर्मचारी/भूकरमापक यांची ८० पदे मंजूर होती मात्र त्यापैकी ३३ पदे रिक्त होती. तसेच सरळसेवा भरती प्रक्रियेतून २१ पदे उपलब्ध झालेली असून अत्याधुनिक अशा रोव्हर मशीनच्या सहाय्याने प्रलंबित मोजणी प्रकरणे सत्वर निकाली काढण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील नायब तहसिलदारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(१०) १९१५९ (०८-०८-२०२३) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ३५८ तालुक्यातील २२०० नायब तहसिलदारांनी राजपात्रित अधिकारी म्हणुन वर्ग दोन श्रेणीचे वेतन मिळावे या मागणीसाठी बेमुदत संप पुकारला असल्याचे माहे एप्रिल २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,या संपात २२०० नायब तहसिलदार सहभागी झाल्याने राज्याच्या तालुक्यातील कामकाज ठप्प झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महसूल विभागातील नायब तहसिलदारांना राजपत्रित वर्ग दोन यांचे ग्रेड पे वाढविण्याबाबत शासन सकारात्मक असतानाही त्यांच्या मागण्या तात्काळ पूर्ण न करण्याची सर्वसाधारण कारणे काय तसेच संपात २२०० नायब तहसिलदार सहभागी झाल्याने राज्याच्या तालुक्यातील कामकाज ठप्प झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील ९४ तहसिलदारांनी मागील सात महिन्यांपासून आवश्यक त्या सर्व कागदपत्राची पूर्ततेबाबत प्रस्ताव सादर करून ही त्यांची पदोन्नती अद्याप झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नायब तहसिलदारांना ग्रेड पे वाढवून देण्यासाठी तसेच ९४ तहसिलदारांची पदोन्नती देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२३-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय कामकाज ठप्प होऊ नये याकरीता आवश्यक ती उपाययोजना करुन राज्यातील तहसिल कार्यालयातील कामकाज सुरळीत चालु ठेवण्यात आले होते.

तसेच, महसूल व वन विभागाच्या अधिपत्याखाली “नायब तहसिलदार” या संवर्गाचा ग्रेड पे ४३००/- वरुन रुपये ४६००/- करण्याच्या अनुषंगाने याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाच्या अभिप्रायार्थ सादर करण्यात आला असता, वित्त विभागाने त्या विभागाचे दिनांक ११/०८/२००४ व दिनांक १३/०२/२०२३ रोजीचे शासन निर्णय विचारात घेवून, तपासणी करण्याबाबत अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

निवडसूची वर्ष २०२२-२३ मध्ये तहसिलदार संवर्गातील रिक्त झालेल्या पदानुसार शासन आदेश दिनांक २०/०४/२०२३, दिनांक ०१/०८/२०२३ व दिनांक ३०/०८/२०२३ अन्वये एकूण ८८ नायब तहसिलदारांना पदोन्नती देण्यात आलेली आहे.
उक्त अ. क्र.२, ३ व ४ येथे नमूद केल्याप्रमाणे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील देवस्थानच्या जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावावर होण्याबाबत

**(११) १९१९२ (०८-०८-२०२३) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील देवस्थानच्या जमीनी शेतकरी पिढयानपिढया कसत असूनही त्यांना मालकी नसल्याने संबंधित शेतकऱ्यांना पीक कर्ज,शासनाच्या शेतीविषयक सुविधांचा लाभ घेता येत नसल्याने शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देवून जमिनी कसणाऱ्यांच्या नांवावर करुन द्याव्यात अशी आग्रही मागणी होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे व त्यावर शासनाकडून किती कालावधीत निर्णय व अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१६-१०-२०२३) :** (१) व (२)

राज्यातील देवस्थान इनाम जमिनींच्या संदर्भात राज्य शासनाची भूमिका ठरविण्याकरीता शासनास शिफारशी करण्यासाठी प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३ मार्च,२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल शासनास अद्यापपर्यंत अप्राप्त आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासी व्यक्तींकडे हस्तांतरीत होत असल्याबाबत

**(१२) १९२३७ (०८-०८-२०२३) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमीनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम १९७४ च्या कलम ३ व ४ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ३६ व ३६-अ नुसार आदिवासींच्या जमिनी जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीशिवाय व शासनाच्या मान्यते शिवाय बिगर आदिवासींकडे कोणत्याही कारणास्तव हस्तांतरीत करता येत नाहीत,हे खरे आहे काय,

(२)असल्यास,आदिवासींच्या मृत्यूपत्राच्या आधारे राज्यात आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासी व्यक्तींकडे हस्तांतरीत करता येत नसतानाही मोठ्या प्रमाणावर हस्तांतरित करुन आदिवासींना भूमिहीन करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त नमूद कायद्यान्वये आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासी व्यक्तींकडे हस्तांतरीत न करण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१६-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

आदिवासी ते बिगर आदिवासी विक्री परवानगीबाबत प्राप्त अर्जाची जिल्हाधिकारी/ तहसिलदार यांचेकडून चौकशी करण्यात येत तपासणी करुन प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत शासनाकडे पुर्व मान्यतेसाठी सादर करण्यात येतात. सदर प्रस्तावास शासनाने पूर्व मान्यता दिल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत विक्री परवानगी बाबत आदेश पारीत करण्यात येतात. आदिवासी खातेदार यांच्या जमिनीवर म.ज.म.अ. १९६६ कलम ३६,३६-अ अन्वये हस्तांतरणास बंदी असे शेरे घेतलेले असल्यामुळे पूर्व परवानगीशिवाय सदर जमिनी विक्री करता येत नाही. तसेच आदिवासी खातेदार भूमिहीन होत असल्यास विक्री परवानगी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नाकारण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा शहरात शासकीय कृषी विद्यापीठ सुरु करण्याबाबत

**(१३) १९२४५ (०८-०८-२०२३) श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा तालुक्यात शासकीय कृषी महाविद्यालय सुरु करण्याबाबत मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कृषी महाविद्यालय बुलढाणा शहरामध्ये सुरु करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०३-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत बुलढाणा येथे ६० विद्यार्थी प्रती वर्ष प्रवेश क्षमता असलेले शासकीय कृषी महाविद्यालय स्थापन करण्यास शासन निर्णय दिनांक १३/०७/२०२३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर महाविद्यालयासाठी आवर्ती / अनावर्ती अशा एकूण रुपये १४६५४.०० लाख खर्चास मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शेतकऱ्यांना पांदण रस्ते नसल्याने होत असलेल्या त्रासाबाबत

**(१४) १९४१९ (०८-०८-२०२३) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृषी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे.त्यामुळे शेतकऱ्याला अन्नदाता म्हणून ओळखले जाते. परंतु, या अन्नदात्याला पांदण रस्ते नसल्याने शेतात ये-जा करताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पांदण रस्ते नसल्याने शेतीतून घेतलेले पीक घरी आणण्यासाठी शेतकऱ्याला मोठी कसरत करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील पांदण रस्त्यांचा प्रश्न निकाली काढण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१०-११-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे. राज्यात अतिवृष्टीमुळे शेत/पाणंद रस्त्याची दुर्दशा झाली आहे.
(३) "मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजना" शासन निर्णय दिनांक ११/११/२०२१ अन्वये राज्यात एकूण ३२५७२.९० कि.मी. लांबीची कामे शासनाने मंजूर केली असून त्यापैकी १५९४६ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी १४६९८ कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आले असून एकूण २६६ कामे पूर्ण झाली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापुर येथे राज्यातील पहिली निसर्ग शाळा उभारण्याबाबत

**(१५) १९५१५ (०८-०८-२०२३) श्रीमती उमा खापरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापुर येथील सिद्धेश्वर वनविहारात ५०० एकर जागेवर राज्यातील पहिला निसर्ग शाळा प्रकल्प उभारण्यात येत असून वनविहाराच्या काही भागात हरित लागवड करून येथे मुलांना दर आठवड्याला निसर्ग शाळेचा आनंद घेण्यासाठी प्रयत्न केला जाणार असल्याची बाब माहे एप्रिल २०२३ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मा.वनमंत्री यांनी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (३०-१०-२०२३) :** (१), (२) व (३) सोलापूर येथील सिध्देश्वर वनविहार हे सोलापूरचे शुध्द हवा देणारे केंद्र निर्माण व्हावे याकरीता तेथे वन उद्यानाची निर्मिती करीता प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना सोलापूर वनविभागास देण्यात आल्या आहेत. त्यानुसार सोलापूर वन विभागामार्फत वन उद्यानाचा प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कोळी मच्छीमार बांधवावर होत असलेल्या अन्यायाबाबत

**(१६) १९८९६ (०८-०८-२०२३) श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोळी मच्छीमार बांधवावर होणाऱ्या अन्यायाबाबत खंदेरी मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित कुलाबा, मुंबई यांनी मा.वनेमंत्री यांना माहे फेब्रुवारी २०२३ रोजी वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे चौकशीच्या अनुषंगाने मच्छीमार बांधवानी दिलेल्या निवेदनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (१३-१०-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा) २०२१ मधील सुधारित तरतूदीन्वये अनधिकृत नौकांस आळा घालण्याच्या दृष्टीने शास्तीच्या रक्कमेमध्ये वाढ करण्यात आलेली आहे. याव्यतिरिक्त मासेमारी नौका, मासेमारी जाळे, नौकेवरील साहित्य व मासळी जप्त करण्याची तरतूद आहे. त्याचबरोबर परप्रांतीय नौका राज्याच्या जलधी क्षेत्रात घुसखोरी करून मासेमारी करतांना निदर्शनास

आल्यास अशा नौकांना जास्तीत जास्त शास्ती लादण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. पर्ससीन, एलईडी लाईट प्रतिबंध व ट्रॉलिंग मासेमारीचे नियमनाच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या नौकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) अधिनियम २०२१ अंतर्गत खटले दाखल करण्यात येत असल्यामुळे पारंपारिक मच्छिमारांचे हितसंबंध जोपासले जात असून मासेमारी प्रयत्नांचे व्यवस्थापनाव्दारे मत्स्यसाठ्याचे जतन करण्यात येवून शाश्वत मत्स्योत्पादन राखले जात आहे. सदर कायद्यातील तरतूदीन्वये एकूण ४९६ अनधिकृत नौकांवर कारवाई करण्यात आली असून रुपये १९७.८५ लक्ष इतकी दंडांची रक्कम महसूल जमा करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्याच्या वन विभागातील रिक्त पदांबाबत

**(१७) २०१४० (०८-०८-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वनविभागातील सहाय्यक वन संरक्षकाना बढती न मिळाल्यामुळे डीएफओची ५५ पदे, सामाजीक वनीकरण विभागातील ८ पदे, वन्य जीव विभागातील ७ पदे वन अधिकारी यांची १४ पदे, तसेच सहाय्यक वन संरक्षकाची अनेक पदे गेल्या ३ वर्षांपासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पदे रिक्त असल्याने प्रशासनास कामे करण्यास अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रिक्त पदे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (१७-१०-२०२३) :** (१) होय, अंशतः खरे आहे.
विभागीय वन अधिकारी संवर्गात मंजूर १०९ पदांपैकी १०७ पदे भरलेली असून ०२ पदे रिक्त आहेत. तसेच, सहायक वनसंरक्षक संवर्गातील २८९ मंजूर पदांपैकी ११७ पदे भरलेली असून १७२ पदे रिक्त आहेत.
(२) होय, अंशतः खरे आहे. वनक्षेत्रपाल संवर्गाच्या ज्येष्ठता यादीबाबत मा.न्यायाधिकरणात प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामुळे इतर अधिकाऱ्यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.
(३) सरळसेवा वनक्षेत्रपालांच्या आपआपसात ज्येष्ठतेबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईत प्रलंबित मागण्यांसाठी ग्रामीण भागातून आलेल्या आंदोलनकर्त्यांना पोलिसांच्या चौकशीच्या ससेमिरातून जावे लागत असल्याबाबत

**(१८) २०५३३ (०४-०८-२०२३) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत ग्रामीण भागातून आलेल्या आंदोलनकर्त्यांना प्रलंबित मागण्यासाठी आझाद मैदानात प्रवेश करण्यापासून ते मैदानात जाईपर्यंत पोलिसांच्या चौकशीतून जावे लागत असल्याची बाब माहे मे, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आझाद मैदानावर आंदोलन करण्याची सरकारची परवानगी असतानाही गेल्या अनेक वर्षापासून आंदोलन करताना पोलिसांकडून नवनवीन अटी घालून आंदोलनकर्त्यांचे खच्चीकरण केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आलेल्या मुंबईकरांनाही नागरिकांनाही यातून सोडण्यात येत नसल्याने आंदोलन करण्यापूर्वीच ते आंदोलन बंद पाडले जात असल्याची भावना आंदोलक कर्त्यांकडून व्यक्त होत आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आझाद मैदान आंदोलनकर्त्यांसाठी कायम खुले असताना पोलिसांनी जाचक अटी न लावता आंदोलकांना स्वतंत्रपणे आंदोलन करण्यासाठी शासनाने तात्काळ दखल घेऊन पोलिसांच्या जाचक अटींना पायबंध घालण्यात यावा अशी मागणी आंदोलन कर्त्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पोलिसांच्या या जाचक अटींना पायबंध घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही. सदर आंदोलकांकडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये याकरीता प्रबिंधात्मक उपाययोजनेच्या दृष्टीने, तसेच लोकशाही पध्दतीने व सनदशीर मार्गाने आंदोलन करण्याच्या अटी व शर्तीवर फौ.द.प्र. संहिता कलम १४९ अन्वये नोटीस देवून आंदोलकांना परवानगी दिली जाते.
(३), (४) व (५) संपूर्ण राज्यभरातुन तसेच ग्रामीण भागातुन आंदोलक हे त्यांच्या विविध अडचणी व प्रलंबित मागण्यांकरीता आंदोलनासाठी आझाद मैदान येथे येत असतात. आझाद मैदानावर येणाऱ्या आंदोलकांकडून आंदोलनाशी संबंधित माहितीपत्रक भरुन घेण्यात येते. सदर भरलेली माहिती अर्जदार मूळ अर्जासह संबंधित पोलीस ठाण्यास सादर करतात. आंदोलक हे त्यांचे आंदोलन सुरु झाल्यानंतर मा.मंत्री महोदयाना तसेच मंत्रालयीन वरिष्ठ अधिकारी तथा इतर शासकीय कार्यालयाचे अधिकाऱ्यांच्या भेटीसाठीचे निवेदन आझाद मैदानाच्या आतील भागात कार्यान्वित असलेले विशेष शाखा-१, परिमंडळ-१, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांचे कार्यालय हे सदरची निवेदने स्विकारतात व संबंधित विभागाशी संपर्क साधुन आंदोलकांची भेट घडवुन आणतात.

सदर प्रक्रियेमध्ये कोठेही जाचक अटी घातल्या जात नाहीत. आझाद मैदान येथे सर्व नागरिकांना लोकशाही पध्दतीने व सनदशीर मार्गाने आंदोलन करण्याची मुभा आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतीकरीता आवश्यक तुकडा बंदी कायद्यात दुरूस्ती करण्याबाबत

**(१९) २०८८८ (२८-०८-२०२३) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक शेतधारकांमध्ये सामुहिक नावे असल्याने शेती विकासाला प्रोत्साहन देणे तसेच शेती उत्पादनात सुधारणा करणे, शेतीची उत्पादकता वाढवणे हा प्रमुख उद्देश ठेवून तुकडेजोड, तुकडेबंदी कायदा अंमलात येऊन शेत सर्वे नंबर वेगवेगळे करण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तुकडा बंदी कायद्यामुळे त्या शेतात विहिर व शेतीवर पीक कर्ज मिळत नसल्यामुळे तथा आवश्यक शासनाच्या सर्व सवलती पासून शेतकरी वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या या समस्येच्या निराकरण हेतू तुकडा बंदी कायद्यात आवश्यक दुरूस्ती करून किमान मर्यादा ही ६० आर. पर्यंत करण्याबाबत शेतकऱ्यांची मागणी असल्याने शासनाने याबाबत निर्णय घेवून सुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०९-११-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात राबविण्यात आलेल्या एकत्रिकरण योजनेंतर्गत याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत होती. तथापि, शासन निर्णय दिनांक ०४/०१/१९९३ अन्वये सदरची योजना स्थगित करण्यात आली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

महाराष्ट्र धारण जमीनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम १९४७ मधील तरतुदीनुसार सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा यांच्या हददी मध्ये समाविष्ट असलेली क्षेत्रे वगळुन दिनांक ०८/०८/२०२३ रोजीचे अधिसूचनेप्रमाणे प्रमाणभूत क्षेत्रामध्ये सुधारणा करणेत आली आहे. सदर अधिसूचनेन्वये राज्यातील ३२ जिल्ह्याकरीता बागायत जमिनीकरीता १० आर व जिरायत जमिनीकरीता २० आर इतके प्रमाणभूत क्षेत्र जाहीर करण्यात आले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नरखेड (जि.नागपूर) येथील शेतकऱ्यांना पीक विमा अंतर्गत नुकसान भरपाई न मिळाल्याबाबत

**(२०) २०८९० (२८-०८-२०२३) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरखेड (जि.नागपूर) तालुक्यातील १०५६९ शेतकऱ्यांच्या शेतीचा पीक विमा आय.सी.आय.सी.आय. लोम्बार्ड या कंपनीद्वारे काढण्यात आला असून शेतकऱ्यांच्या शेत पिकाची अस्मानी तथा अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची सदर पीक विमा कंपनीने अद्यापही भरपाई दिलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना पीक विम्याची भरपाईची रक्कम तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत तसेच खरीप व रब्बी पिकांचा विमा काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०७-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम सन २०२२-२३ अंतर्गत नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्यात १०५६९ शेतकऱ्यांनी तर रब्बी हंगामात एकूण १०१८ शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला आहे. खरीप २०२२ मध्ये स्थानिक नैसर्गिक आपत्ती अंतर्गत ६६२१ शेतकऱ्यांना एकूण रक्कम रुपये ५२.५६ लाख तसेच हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत नुकसान या बाबी अंतर्गत १०५६९ शेतकऱ्यांच्या खात्यात एकूण रक्कम रुपये ४३९.६९ लाख विमा कंपनी मार्फत जमा करण्यात आली आहे. तसेच रब्बी हंगाम २०२२-२३ मध्ये स्थानिक नैसर्गिक आपत्ती अंतर्गत १११ शेतकऱ्यांच्या खात्यात एकूण रक्कम रुपये ४.७६ लाख व काढणीपश्चात नुकसान या बाबी अंतर्गत १४५ शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसान भरपाई रक्कम एकूण रुपये ३.५३ लाख विमा कंपनी मार्फत जमा करण्यात आली आहे. असे एकूण रुपये ५००.५५ लाख रकमेची नुकसान भरपाई देण्यात आली आहे.

खरीप हंगाम सन २०२३-२४ अंतर्गत गाव पातळीवर गाव सभा, शेतकरी सभा, पीक विमा प्रचार व प्रसिध्दी रथ तसेच स्थानिक वृत्तपत्रा मार्फत प्रचार प्रसिध्दीची कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच याबाबत रब्बी हंगामातही पीक विम्याबाबत प्रचार प्रसिध्दी प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.